# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी अभियान राबविणेबाबत

**(१) ३०४७ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंप्री (ता.धरणगाव जि.जळगाव) येथील शाळेत २४२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असता त्यापैकी ७१ विद्यार्थी प्री–डायबेटीक (मधुमेहपूर्व) आढळून आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्याच्या धर्तीवर राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील शाळांमध्ये आरोग्य तपासणी अभियान राबविण्याचे शासनाचे विचाराधीन आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरोग्य तपासणी अभियान राबविणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ०१/०४/२०१३ पासून लागू करण्यात आला आहे.या अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्याक्रमामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीतील बालकांची वर्षातून २ वेळा आणि ६ ते १८ वर्षे वयोगटातील शासकीय आणि निमशासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांची वर्षातून १ वेळा आरोग्य तपासणी करण्यात येते.तसेच आदिवासी जिल्ह्यातील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची ३ महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते.

तपासणी दरम्यान मुलांमध्ये आढळणाऱ्या जन्मत: असलेले व्यंग लहान मुलांमधील आजार, पोषणाच्या घटकांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व जन्मत: अंपगत्व इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(३) महाराष्ट्रात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत एकूण ११९६ पथके सन २०२२-२३ च्या पीआयपीमध्ये मंजूर करण्यात आलेली आहेत. यापैकी १११० पथके महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी

भागासाठी (बृहन्मुंबई वगळता) कार्यरत आहेत. बृहन्मुंबईसाठी ५५ पथके मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच ३१ पथके आदिवासी जिल्हयांमधील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यासाठी मंजूर आहेत.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाची पथके प्रत्येक तालुक्यात नियुक्त करण्यात आलेली आहेत. सदर पथकाचे मुख्यालय, ग्रामीण रुग्णालये किंवा संबंधित उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय हे आहे.

जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्र (District Early Intervention Centre) प्रकल्पाच्या माधमातून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील अंगणवाडी स्तर आणि शाळा स्तरांवरुन संदर्भित करण्यात आलेल्या बालकांच्या बौध्दिक, मानसिक आणि शारिरीक स्थितीचा विकास आणि उपचार करणेसाठी राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये डिईआयसी स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२) ३४४६ (१०-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामपातळीवर आरोग्य सेवा सक्षमिकरणासाठी आयुष्मान भारत योजनेतंर्गत आयुष्मान आरोग्य मंदीरमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी संवर्गाचा महत्वाचा वाटा असून ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी हे अधिकारी अत्यंत प्रखरतेने काम करीत असून कोविड काळामध्येसुद्धा ग्रामपातळीवर जीवाची पर्वा न करता या समुदाय अधिकाऱ्यांनी अविरत सेवा दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत ग्रामीण पातळीवर विविध आरोग्य विषयक योजना राबवितांना या संवर्गाला विविध अडचणी आणि समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेने वारंवार शासनाला त्यांच्या समस्यांबाबत निवेदन देऊन समस्यांचे निराकरण व सोडवणूक करण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रामधील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या समस्यां सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२४-०२-२०२६) :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानात आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवेत समुदाय आरोग्य अधिकारी हा महत्वाचा घटक आहे.

(२) व (३) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या संघटनेकडून त्यांच्या संवर्गाच्या अडचणीबाबत निवेदने प्राप्त आहेत. सदर निवेदनाच्या अनुषंगाने समुदाय आरोग्य अधिकारी यांची बदलीबाबत शासन निर्णय दिनांक १०/१२/२०२४ व दिनांक २७/०५/२०२५ अन्वये धोरण निश्चित केले आहे. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या स्तरावरुन बदलीची प्रक्रिया सुरू आहे. तसेच आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या स्तरावून दिनांक ०८/१०/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये १५ टक्के (५ % सरसकट व १० % कामगिरी आधारित/

कार्यमुल्यांकनावर) मानधनवाढ करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहर व जिल्ह्यांतील रक्त पेढयांमधील रक्त तुटवडा दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३) ४११९ (१०-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या मेडिकल रक्तपेढीत केवळ ३० युनिट होल ब्लडच्या बॅग शिल्लक असून नागपूर शहर आणि जिल्ह्यातील रक्त पेढ्यांमध्ये रक्तांचा तुटवडा असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रक्त टंचाईला सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, नागपूर शहर आणि जिल्ह्यातील रक्त पेढ्यांमधील रक्तांचा तुटवडा दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये सरासरी १५० (किमान ९८ ते कमाल १७२ दरम्यान) पेक्षा जास्त रक्तपिशव्या उपलबध होत्या मे, २०२५ महिन्याचे एकूण रक्त संकलन ८६२ रक्तपिशव्या एवढे होते.

नागपूर शहर व जिल्ह्यातील रक्तकेंद्रामध्ये दिनांक ०७/०५/२०२५ ते दिनांक १५/०५/२०२५ या कालावधीमध्ये प्रतिदिन सरासरी २३०० (किमान २१६५ ते कमाल २४१६ दरम्यान) पेक्षा जास्त रक्तासाठा उपलब्ध होता.

(२) राज्यात रक्तदान शिबीरे, रक्त संकलन व रक्तदानाद्वारे भरपाई होणे ही शृंखला सातत्याने सुरु आहे. तसेच गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

राज्यात मिशन ब्लड नो शॉर्टेज नो वेस्टेज धोरण आखण्यात येत असून बर्थडे ब्लड डोनर्स क्लब वाढदिवस रक्तदान योजनाच्या माध्यमातून ते राबविण्यात येणार आहे. जेणेकरुन भविष्यात रक्ताची टंचाई अथवा अतिरिक्त रक्त साठवण्याची समस्या उद्‌भवणार नाही.

(३) लागू नाही.

---

## राज्यासह गडचिरोली व देसाई गंज शहरी भागातील गरजू रुग्णांसाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात सोयी -सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४) ४१४६ (१५-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरी भागातील गरजू रुग्णांना त्यांच्याच परिसरात आरोग्याच्या सोयी-सुविधा मिळण्यासाठी राज्य शासनाकडून बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही योजना गडचिरोली व देसाई गंज शहरात सुरु करण्यात आली असली तरी शहरी भागातील व तालुक्यातील या दवाखान्यासाठी स्वतंत्र इमारती नसून भाड्याच्या खोलीत आपला दवाखाना सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरी भागात व तालुक्यातील विविध भागातील लोकसंख्या लक्षात घेऊन आरोग्य विषयक आपल्या दवाखान्यात विविध आजारांचे तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, रक्तचाचणी तपासणी, तसेच औषधाचा पुरवठा, आरोग्याच्या सुविधा, गरजू रुग्णांना मिळण्यासाठी शासन स्तरावर कोणती उपाययोजना वा कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ११ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना भाड्याच्या जागेत सुरु करण्यात आलेले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील २ आपला दवाखाना मंजूर असून दोन्ही आपले दवाखाने भाड्याच्या जागेत सुरु आहे.

(२) गडचिरोली जिल्हयांत मंजूर व कार्यरत २ दवाखाने असून त्यांचे माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. आपला दवाखाना अंतर्गत मंजूर व कार्यरत पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.
१) वैद्यकिय अधिकारी मंजूर पदे २, भरलेली पदे २
२) स्टॉफ नर्स - मंजूर पदे २, भरलेली पदे २
३) एमपीडब्लू - मंजूर पदे २, भरलेली पदे १
४) सुरक्षाकर्मी - मंजूर पदे २, भरलेली पदे २
५) स्वच्छताकर्मी - मंजूर पदे २, भरलेली पदे २

• सदरचे ठिकाणी विशेषज्ञ नियुक्तीचे प्रावधान नाही.
• HLLच्या माध्यमातून रक्त तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
• जिल्हास्तरावर मंजूर करण्यात आलेल्या १० टक्के निधीतून स्थानिक पातळीवर अत्यावश्यक औषधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
• दिनांक ११ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
• दोन आपला दवाखानातंर्गत अद्यापपर्यंत ७८५६ बाह्यरुग्ण, १०४ गर्भवती/प्रसूती झालेल्या महिला व ७६४ रुग्णांची प्रयोगशाळे मार्फत रक्त तपासणी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील व्यवस्थापनेच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूमूखी पडलेल्या कुटुंबियांना न्याय देण्याबाबत

**(५) ४७६८ (१४-१२-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील परिचारिकांच्या संपामुळे आणि वैद्यकीय

कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोन दिवसांच्या नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची व सदर प्रकरणी नवजात बालकाच्या मृत्यूबाबत सदर कुटुंबियांची तक्रार पोलिसांनी नोंदवून घेण्यास नकार दिल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा संपाच्या परिस्थितीत रुग्णांची सुरक्षा व त्यांना विनाविलंब वैद्यकीय उपचार व सेवा सुविधा मिळण्याबाबत शासनाचे नेमके धोरण निश्चित केले आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तसेच सदर घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) संपाच्या परिस्थितीत रुग्णसेवेत अडथळा येवू नये याकरीता रुग्णालयातील विभागप्रमुख, इतर संबंधित विभागाचे डॉक्टर, निवासी डॉक्टर, आंतरवासियता विद्यार्थी यांची नेमणुक करण्यात येते. तसेच संप काळात परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्याची कमी पडू नये याकरीता संस्थेतील व इतर परिचर्या महाविद्यालयातील अंतिम वर्षांचा विद्यार्थ्यांना नेमणुक देण्यात येते. संप काळात कोणताही अनुचित प्रकार न व्हावा याकरीता महाराष्ट्र सुरक्षा दल व मेस्को यांना काटेकोर पणे सुरक्षा व्यवस्था राखण्याचे निर्देश देण्यात येतात.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामविकास भवन, खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील इमारत पनवेल महानगरपालिकेस भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) ४८६० (२२-१२-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामविकास विभाग आणि जलसंधारण विभागाच्या संबंधित सर्व शासकीय कामे करण्याच्या हेतूने पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर या ठिकाणी "ग्रामविकास भवन" उभारलेले असून सदरचे ग्रामविकास भवन सद्य:स्थितीत दुर्लक्षित असल्याने या ग्रामविकास भवनची इमारत पनवेल महानगरपालिकेला भाडेतत्त्वावर वापरण्यास मिळावी अशी मागणी पनवेल म.न.पा.कडून ग्रामविकास विभागाकडे करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल महानगरपालिकेकडून सदरचे 'ग्रामविकास भवन' भाडेतत्त्वावर मिळण्यासाठी करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने ते उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही, मागणी करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील परिचारिका भरती संदर्भातील निर्णय मागे घेण्याबाबत

**(७) ४९१२ (२२-१२-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने (DMEER) परिचारिका भरतीत महिलांसाठी ८०% आणि पुरुषांसाठी २०% जागा राखीव ठेवल्याच्या निर्णयामुळे पुरुषांच्या ‘मेल नर्सेस बचाव समिती’ ने राज्यभर आंदोलन सुरू केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे सुमारे पाच लाख पुरुष नर्सेसचे भविष्य धोक्यात आल्याचा दावा केला जात आहे आणि आंदोलकांनी ही आरक्षणाची टक्केवारी रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच शैक्षणिक अर्हता व गुणवत्तेनुसार भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने (DMEER) घेतलेला उक्त निर्णय तात्काळ रद्द करावा व शैक्षणिक अर्हता व गुणवत्तेवर भरती प्रक्रिया राबवणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) या प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून दिनांक २६/०८/२०२५ रोजी प्राप्त अहवालातील वस्तुस्थिती विचारात घेऊन दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या अधिसुचनेतील अधिपरिचारिकांच्या पदभरतीमध्ये महिला व पुरुष यांच्याकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या कोट्यामध्ये कोणताही बदल न करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी (जि.वर्धा) येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत

**(८) ५१८३ (१४-१२-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) शहर हे अमरावती-वर्धा-नागपूर व यवतमाळ या चारही जिल्ह्याच्या मध्यभागी असल्याने या परिसरातील नागरिकांना आरोग्य विषयक सोई सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणीकरीता लागणारी जागाही शहरामध्ये उपलब्ध असल्यामुळे येथे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व आरोग्य, मंत्री यांचेकडे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी येथे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सद्य:स्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वर्धा करीता सुयोग्य अशी मौजे जांब, ता.समुद्रपूर येथील सर्वे क्र. ३२० मधील १२ हे.आर. जागा उपलब्ध झाली असून सदर जागेचा ताबा अधिष्ठाता यांनी दिनांक ९/०६/२०२५ रोजी घेतला आहे. तसेच सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फ़त करण्यात येत असून कंत्राटदाराची नियुक्ती देखील करण्यात आली आहे.

---

## राज्यातील शासकीय अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ५६०० (१४-१२-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आणि अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या प्राध्यापकांची भरती थेट नियुक्तीद्वारे करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास शासन निर्णय जारी केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,
(२) असल्यास, उक्त पदासांठी गेल्या दोन वर्षात खूप कमी जागांची भरती झाली असून आतापर्यंत किती प्राध्यापकांची भरती झालेली आहे याचा तपशिल काय आहे तसेच उक्त पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२०-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

शासन निर्णय,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक ०७/१०/२०२४ अन्वये राज्यातील अनुदानित खाजगी आयुर्वेद व अनुदानित खाजगी युनानी महाविद्यालयांमधील (अल्पसंख्यांक दर्जा असलेली महाविद्यालये वगळता) प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापक या अध्यापकीय संवर्गातील सरळसेवेने भरावयाची पदे वेळोवेळीच्या प्रचलित नियमांनुसार पात्र उमेदवारांमधून निवडीकरीता संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली निवडसमिती गठीत केली आहे.
(२) खाजगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापक संवर्गाची रिक्त पदभरती अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र. ९६६२/२०१७ प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २३/०३/२०२२ रोजी आदेश दिले आहेत. सदर आदेशाविरुध्द अनुदानित खाजगी संस्थांनी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्र.१०९८५/२०२२ दाखल केली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने खाजगी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील सरळसेवेची

अध्यापकीय पदे भरता आली नाहीत. सबब खाजगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांमधील अध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ०७/१०/२०२४ अन्वये निवडसमिती गठीत केली आहे.

खाजगी अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापक संवर्गातील रिक्त पदभरतीबाबतची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| संवर्ग | पदभरती प्रक्रिया पूर्ण झालेली पदसंख्या | पदभरती प्रक्रिया सुरु असलेली पदसंख्या |
|---|---|---|
| प्राध्यापक | - | ३ |
| सहयोगी प्राध्यापक | ११ | १९ |
| सहायक प्राध्यापक | २८ | ३२ |
| एकूण | ३९ | ५४ |

तसेच एकूण १४ अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांपैकी १० महाविद्यालयांमध्ये पदभरतीची प्रक्रिया सुरु / प्रक्रिया पार पडली आहे.तर, उर्वरीत ४ महाविद्यालयांनी बिंदुनामावली प्रमाणित करुन, पदभरतीचा प्रस्ताव सादर केलेला नसल्यामुळे, कार्यवाही संस्था स्तरावर प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे २ अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त आयुर्वेद महाविद्यालयांतील अध्यापकीय पदे सरळसेवेने भरण्याची प्रक्रिया नियमितरित्या चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गुणवंत कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१०) ५७४९ (२२-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुणवंत कामगारांना राज्य शासनाच्या इतर विभागांच्या पुरस्कारार्थीप्रमाणे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करताना सवलत देणे, महाराष्ट्र कामगार मंडळाच्या संचालक पदी एका गुणवंत कामगाराची नियुक्ती करणे, त्यांना एक वेतन वाढ मिळणे, ज्या जिल्ह्यात कामगार भवन नाही तेथे शासन निर्णयाप्रमाणे कामगार भवन बांधणे इत्यादी मागण्यांसाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, प्रधान सचिव, कामगार यांचेकडे सातत्याने मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांचा कोणताही आर्थिक बोजा शासनावर न येता या मागण्या पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, सदर कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१८-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मधून गुणवंत कामगारांना प्रवास करतांना सवलत मिळण्याचा

प्रस्ताव विचाराधीन आहे.

राज्यातील गुणवंत कामगारांना एक वेतन वाढ मिळणे हि बाब त्या त्या कंपनी व्यवस्थापनांशी संबंधित आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१९५/कामगार-८ दिनांक ०७/१२/२०२३ अन्वये कामगार आयुक्त व त्यांच्या अधिनस्त प्रत्येक जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेली कार्यालये व त्या त्या कार्यालयातील आकृतीबंधानुसार शासकीय मानकांप्रमाणे कामगार भवनास आवश्यक असलेल्या जागेचा विचार करुन कामगार भवनाचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण करुन त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन घेण्यात आलेल्या योजना/संकल्प आराखड्याना (Type Plans- A,B,C,D) प्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शासन मान्यतेनुसार संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालय यांचेकडे कामगार भवन उभारण्यासाठी सोयीस्कर जमीन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सातत्याने पाठपुरवठा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सद्य:स्थितीत जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी स्वतंत्र कामगार भवन उभारण्याचे काम हे अनुक्रमे पुणे, बुलढाणा, वाशिम, परभणी, अकोला व धुळे या जिल्हयांमध्ये प्रगतीपथावर आहे. तसेच उद्योग विभागामार्फत जिल्ह्याच्या एम आय डी सी विभागाकडे जालना, बीड, अमरावती, जळगाव, वर्धा, भंडारा, बीड, रत्नागिरी, गडचिरोली, इत्यादी ०९ जिल्ह्यांकरीता जिल्हा उद्योग भवनामध्ये फर्निचर सह जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ६०३२ (२२-१२-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये गेल्या काही वर्षांपासून मनुष्यबळाची कमतरता असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सात उपविभागामध्ये तब्बल पाच उपअभियंत्याची पदे रिक्त असून सध्या मोर्शी, अमरावती येथेच नियमित उपअभियंते कार्यरत असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती विभागातील रिक्त असलेल्या पाच उपअभियंत्याचे कामकाज हे शाखा अभियंत्यावर सोपविण्यांत येत असल्यामुळे, प्रभारी अधिकाऱ्यांना एकाच वेळी आपले नियमित काम आणि वरिष्ठ पदांची जबाबदारी सांभाळावी लागत असल्यामुळे त्यांच्यावर येणाऱ्या अतिरिक्त तणावाचा परिणाम त्यांच्या कामकाजावर होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडे पदे भरण्याबाबत प्रस्ताव सादर केला असतानाही सदरहू पदे अद्यापही भरली नसल्याने उपअभियंत्याच्या पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक १६/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत महाराष्ट्र तांत्रिक सेवेतील ५ रिक्त पदे भरण्याची विनंती केली होती.त्यानुषंगाने सदरहू ५ रिक्त पदांपैकी शासन आदेश दिनांक २५/०७/२०२५ अन्वये २ पदे भरण्यात आली असून उर्वरित ३ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-कांजुरमार्ग स्टेशन परिसरातील ऑटोरिक्षा चालकांकडूनची लूट करण्यात येत असल्याबाबत

**(१२) २०९५१ (०४-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-कांजुरमार्ग स्टेशन पश्चिमेस रिक्शा स्टँड असून तिथून मोठ्या प्रमाणात प्रवाशांची लूट होत असून नियमानुसार प्रवाशांकडून भाडे न स्वीकारता रिक्षाा चालक रिक्षा चालक मनमानीपणे प्रवासभाडे आकारत आहेत. तसेच जवळचे भाडे नाकारुन लांबच्या भाड्यासाठी प्रवाशांबरोबर भांडणे करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमानुसार येथून प्रवाशांना सुविधा देण्यात येत नसून प्रवाशांना मारहाण करणे किंवा त्यांना रस्त्यात उतरुन देत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कांजूरमार्ग पश्चिमेस पोलीस चौकी असूनही त्यांच्याकडून रिक्शा चालकांवर कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यापुढे स्थानिक पोलिसांकडून या रिक्शा चालकांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (२९-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) याबाबत दिनांक ०९/०३/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे तक्रार प्राप्त झाली होती. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) या कार्यालयातंर्गत तीन वायुवेग पथके कार्यरत असून या वायुवेग पथकांद्वारे ऑटो रिक्षा वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते.

दैनंदिन प्रवास करताना नागरिकांना ऑटोरिक्षा / टॅक्सी चालकांकडून होणाऱ्या समस्यांबाबत तक्रार दाखल करण्याकरीता दिनांक ११/०७/२०२३ पासून व्हॉटसअॅप क्रमांक व ईमेल आयडी कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर सुविधेतंर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) कार्यालयामध्ये, जानेवारी २०२५ ते ऑक्टोबर, २०२५ पर्यंत एकूण ३१० तक्रारी प्राप्त झाल्या असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना नोटीसा जारी करुन रुपये ४.२१ लक्ष इतके तडजोड शुल्क / दंड वसुल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मा.न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करून बलात्कार पीडितेची माहिती उघड करणाऱ्या डी. बी. भडकमकर मार्ग पोलीस ठाण्यातिल अधिकारी / कर्मचाऱ्यावर कारवाई होणेबाबत

**(१३) २०९५७ (०१-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डी. बी. भडकमकर मार्ग पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी एका बलात्कार पीडित महिला व तिच्या कुटुंबियांची माहिती माहितीच्या अधिकारात उघड केली असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर प्रकारामुळे मा.सर्वोच्च न्यायालय, तसेच मुंबई उच्च न्यायालयाने बलात्कार पीडित महिलांच्या बाबतीत वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन पोलीस अधिकाऱ्यांकडून तसेच माहिती मागविण्याऱ्या वकिलाकडून तसेच माहितीचा वापर करणाऱ्या संबंधीताकडून करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकारामुळे मानसिक धक्का बसलेल्या संबंधित पीडितेने सातत्याने न्याय मिळविण्यासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डी. बी. भडकमकर मार्ग पोलीस ठाणे यांच्याकडे दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार अर्ज दाखल करूनही आजतागायत कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मा.न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करून बलात्कार पीडितेची माहिती उघड करणाऱ्या डी. बी. भडकमकर मार्ग पोलीस ठाण्यातील अधिकारी / कर्मचाऱ्यावर तसेच माहिती मागविणाऱ्या वकिलाकडून तसेच माहितीचा वापर करणाऱ्या संबंधीतावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-११-२०२५) :** (१) हे खरे नाही,

डॉ. दा. भ. मार्ग पोलीस ठाण्याच्या अभिलेख पडताळणीवरुन सदर पोलीस ठाण्यात दाखल गु.र.क्र. २८/२०१७, कलम ३७६(१), ४५२, ३५४ (अ), ३५४ (ब), ५०९ भा.द.वि. ची एफआयआरची Certified or true Copy सन २०१७ पासून आजपर्यंत माहितीचे अधिकारांतर्गत (PIO & ACP, Girgaon Division) यांचेकडून कोणासही देण्यात आलेली नाही.

(२) हे, खरे आहे,

ॲड. निखील गोळे यांनी माहितीचे अधिकार अधिनियमांतर्गत दिनांक १०/०८/२०२२ रोजीचे अर्जान्वये नमुद गु.र.क्र. २८/२०१७, कलम ३७६(१), ४५२, ३५४ (अ), ३५४ (ब), ५०९ भा.द.वि. ची एफआयआरची सत्य प्रतीची मागणी केली होती. परंतु त्यांना सदरची माहिती दिनांक ०६/०९/२०२२ रोजीचे पत्रान्वये नाकारण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते.

मात्र, प्रथम अपीलाचे सुनावणीआधीच ॲड. निखील गोळे यांनी डॉ. दा. भ. मार्ग पोलीस ठाण्याचे अंमलदारांकडून न्यायालयीन कामकाजाचे निमित्त सांगून नमुद गु.र.क्र. २८/२०१७ चे एफआयआरची सत्य

प्रत परस्पर प्राप्त केलेली आहे.

(३) हे खरे नाही,

दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजीच्या सुमारास तक्रार अर्जाच्या अनुषंगाने ॲड. निखील गोळे यांना गु.र.क्र. २८/२०१७, कलम ३७६(१), ४५२, ३५४ (अ), ३५४ (ब), ५०९ भा.द.वि. ची एफआयआरची कॉपी पुरवणाऱ्या पोलीस अंमलदारांवर विभागीय चौकशी अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणाची सहायक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग, मुंबई यांनी संक्षिप्त चौकशी केली आहे. त्यानुसार सहायक पोलीस उप निरीक्षक ३०७६२/श्री.विश्वनाथ अर्जुन घाडी हे दोषी आढळल्याने त्यांचेवर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ कार्यालयाकडून दिनांक ०२/११/२०२३ रोजीच्या अंतिम आदेशान्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) २१४५० (०४-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध सण, उत्सव तसेच निवडणूक बंदोबस्तासह कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या पोलीस निरीक्षकांची सुमारे ८०० पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृह खात्याकडून गत दोन वर्षांपासून पोलीस निरीक्षकांची पदे भरण्यात आलेली नसून ३० ते ३५ टक्के पोलीस निरीक्षकांची पदे रिक्त असल्याने पोलीस दलावर रिक्त पदांमुळे ताण येत असून सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक २ मार्च २०२३ रोजी दोन वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात आलेली आहे, शासन निर्णयामुळे अनेक उमेदवार निकषातून बाद होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२३ अखेर प्रत्यक्षात नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची ५३० पदे रिक्त होती.

(२) पोलीस निरीक्षक यांची पदे ही सरळसेवेने भरली जात नसून १००% पदे ही पदोन्नतीद्वारे भरण्यात येतात. त्यामुळे सदर पदोन्नतीसाठी वयोमर्यादेचे निकष लागू होत नाहीत.

(३) सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी सन २०२२-२३ च्या निवडसूचीकरीता एकूण ६७८ पदांसाठी दिनांक २१/०३/२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली. दरम्यान पोलीस निरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठी योग्य मानीव दिनांक मिळण्यास आदेश

होण्याबाबत श्री.शंकर मुटेकर व इतर (एकूण ४३) व श्री.संतोष पाटील व इतर एकूण (४१) दोन्ही मिळून एकूण ८४ यांनी दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.५५७/२०२१ व ६७६/२०२१ च्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठाने दिनांक ०९/०६/२०२२ च्या आदेशान्वये सपोनि ते पोनि पदाच्या पदोन्नतीवर स्थगिती दिली, त्यामुळे सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात आली नाही..

उक्त न्यायालयीन प्रकरणांत मा.न्यायाधिकरणाने दिनांक २३/०९/२०२२ व दिनांक २८/०९/२०२२ रोजी आदेश पारित करुन याचिकाकर्त्यांना मानीव दिनांक देण्याबाबतचे आदेश दिले आहे. सदर आदेशाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात शासनाने रिट पिटीशन क्र.१५४८/२०२३ दाखल केली आहे.

शासनाने दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.१५४८/२०२३ च्या अनुषंगाने ८४ पदे रिक्त ठेवून सन २०२२-२३ च्या निवडसूचीवरील उर्वरित पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने मा.उच्च न्यायालयात आय.ए.क्र.१६७७९/२३ दाखल केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सहायक पोलीस निरीक्षक पदावरुन पोलीस निरीक्षक पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने निवडसूची वर्ष २०२२-२३ च्यावेळेस न्यायालयीन प्रकरणे दाखल झाली. त्यामध्ये सत्र क्र. १०२ मधील सहायक पोलीस निरीक्षक श्री.संतोष खानविलकर व इतर १९९ यां नी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. १२२६/२०२२ व संकीर्ण अर्ज क्र. ७११/२०२२ दाखल के ला. त्यामध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १९/१२/२०२२ व दिनांक ०८/११/२०२३ रोजी आदेश पारित करुन पोलीस उप निरीक्षक पदाच्या मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेमध्ये आरक्षण घेवून उत्तीर्ण झालेल्या व पोलीस उप निरीक्षक पदाची सेवाज्येष्ठता प्राप्त झालेल्या सत्र १०२ व त्यावरील सहायक पोलीस उपनिरीक्षकांना वगळून इतर पात्र सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देण्याबाबत निदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाचे आदेश दिनांक १५/०३/२०२४ अन्वये १६८ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली.

तसेच, सत्र क्र.१०३ मधील अर्जदार श्री.बी.डी. कांबळे व इतर सहायक पोलीस निरीक्षक यांनी पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळणेबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. १२६८/२०२२ व संकीर्ण अर्ज क्र. १७/२०२४ दाखल केला. त्यामध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १६/०१/२०२४ व दिनांक १८/०४/२०२४ च्या रोजी आदेश पारित करुन सरळसेवेने पोलीस उपनिरीक्षक पदावर भरती झालेल्या सत्र १०३ मधील अधिकाऱ्यांना पदोन्नतीने कार्यमुक्त करण्याचे निदेश दिले.

त्यानुसार पोलीस निरीक्षक पदावरील पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या सत्र क्र.१०३ मधील ४३३ सहायक पोलीस निरीक्षकांना, पोलीस निरीक्षक पदावर पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १०/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलीस अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत

**(१५) २२८८५ (१०-०४-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०२३ मध्ये उपनिरीक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पोलीस अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती न दिल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन २५ टक्के कोटा वाढवून २४२५ ऐवजी ५ हजार पदे भरुन पोलीस अंमलदारांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयाने सन २०१३ मध्ये पोलीस अंमलदारांची अर्हता परीक्षा आयोजित केली होती. सदर अर्हता परीक्षा-२०१३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या अंमलदारांना स्थानापन्न २५ टक्के कोट्यातील निःशस्त्र पोलीस उप निरीक्षकांची जशी जशी पदे रिक्त झालेली आहेत, त्याप्रमाणे पात्र अंमलदारांना पोलीस उपनिरीक्षक पदी आजमितीस पदोन्नती देण्यात आलेली आहे.
(३) निवडसूची वर्ष २०२३-२०२४ मध्ये एकूण ७६० अंमलदारांना व निवडसूची २०२४-२०२५ मध्ये एकूण ८६६ पोलीस अंमलदार यांना पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

गृह विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०१/०९/२०२५ अन्वये पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या पदभरतीचे प्रमाण ५०:२५:२५: (सरळसेवा : मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा (LDCE): पदोन्नती (पदोन्नती ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे) असे नमूद केले आहे. त्यानुसार स्थानापन्न पदोन्नतीच्या २५% कोटयामध्ये निवडसूची वर्ष २०२५-२०२६ करीता उपलब्ध रिक्त पदानुसार पदोन्नतीची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलिसांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस हाऊसिंग बोर्डाला अतिरिक्त अधिकार देण्याबाबत

**(१६) २३०९१ (२२-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलिसांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस हाऊसिंग बोर्डाची स्थापना करण्यात आलेली असून सदर बोर्डाकडे १८७ शहरातील पोलिसांच्या घरांची वसाहती बांधकाम प्रस्ताव प्राप्त यात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणात स्टाफ क्वार्टर्स बांधणे आवश्यक असून यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पातून प्राप्त होणारे अनुदान अपुरे असल्यामुळे गृह विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत डीसीपीआर २०३४ मधील विनियम ३३ (३) (अ) च्या अनुषंगाने पोलीस विभागाच्या अधिपत्याखालील जमिनीवर पोलीस गृहनिर्माण करीता महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्याबाबत व त्यांनाच अशा प्रकल्पांसाठी विकासक म्हणून घोषित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, २०१९ रोजी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या घरांचे बांधकाम करण्यासाठी मोठी प्रतीक्षा यादी असल्यामुळे शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी, २०१९ च्या प्रमाणे राज्यभरात पोलीस विभागाच्या अधिपत्याखालील जमिनीवर पोलीस गृहनिर्माण करीता महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्याबाबत व त्यांनाच अशा प्रकल्पांसाठी विकासक म्हणून घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२५) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत डीसीपीआर- २०३४ मधील विनियम ३३(३) (अ) च्या अनुषंगाने अशा प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांना शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-०१२१/प्र.क्र.२६/पोल-७, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१ अन्वये विकासक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.
(२) व (३) सदर विषयाबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या विनंतीनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास संपूर्ण महाराष्ट्रासाठी विकासक म्हणून नेमणूक करण्याबाबत प्रकरण शासन विचाराधीन असून लवकर त्यावर निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परिक्षेचा निकाल जाहीर करण्याबाबत

**(१७) २३१०६ (१६-०७-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२३ ची पहिली उत्तर तालिका दिनांक ५ नोव्हेंबर, २०२३ ला तर अंतिम उत्तर तालिका दिनांक २४ जानेवारी, २०२४ ला जाहीर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने संयुक्त परीक्षा २०२३ साठी जानेवारी, २०२३ मध्ये जाहिरात देण्यात आली त्यानुसार सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व दुय्यम निबंधक अशा ७३८ पदांसाठी अर्ज मागविण्यांत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संयुक्त परीक्षा २०२३ ची अंतिम उत्तर तालिका येवूनसुध्दा अद्यापही निकाल जाहीर केला नसण्याची कारणे काय आहेत, या परिक्षेचे निकाल त्वरीत जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या संयुक्त सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२३ ची प्रथम उत्तर तालिका दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी व अंतिम उत्तर तालिका दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे, महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा २०२३ मधील सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व दुय्यम निबंधक या सवंर्गातील एकूण ७४६ पदांसाठी जानेवारी, २०२३ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या संयुक्त सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२३ ची अंतिम उत्तर तालिका प्रसिध्द झाल्यानंतर मा.महाराष्ट्र प्रशासकीय दिनांक १० मे, २०२४ च्या न्यायाधीकरणाच्या आदेशानुसार संमती विकल्प निवडण्यासाठी आयोगामार्फत दिनांक २४ जून, २०२४ ते ३० जून, २०२४ कालावधीत मुदत देण्यात आली होती.

त्यानुसार प्राप्त संमती विकल्पानुसार विहीत प्रक्रिया राबविल्यानंतर दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षण संवर्गाचा अंतिम निकाल प्रसिध्द करण्यात आला असून शासनास शिफारशीही पाठविण्यात आल्या आहेत.

राज्यकर निरीक्षक या संवर्गाकरीता सुधारित शिफारस यादी क्रमांक ८, गुणांची सिमारेषा तसेच गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ६ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. आणि या संवर्गाचा अंतिम निकाल दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

तसेच सहायक कक्ष अधिकारी या संवर्गाचा अंतिम निकाल दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे. यासोबतच पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अतिंम निकाल दिनांक २६ मे, २०२५ रोजी जाहीर करण्यात आला असून आयोगाच्या दिनांक ३० मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस पात्र उमेदवारांची संबंधित विभागाकडे शिफारस करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ६०० पोलिसांची पदोन्नती प्रलंबित असल्याबाबत

**(१८) २३३८२ (२२-०७-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पोलीस दलातील ८४ पोलीस अधिकाऱ्यांनी जेष्ठता यादीमध्ये वर असलेल्या तुकडीपूर्वी पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळविण्यासाठी ‘‘मॅट’’ मध्ये प्रकरण दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १०३ क्रमांकाच्या तुकडीतील सहाय्यक पोलीस निरीक्षक मागील अडीच वर्षांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असून गृहमंत्रालय आणि पोलीस महासंचालक विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष व दिरंगाई होत असल्याने पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक दर्जाच्या ६०० पोलीस अधिकाऱ्यांची पदोन्नती प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पदोन्नतीपासून वंचित असलेल्या पोलिसांना पदोन्नती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये ज्येष्ठतायादीच्या अनुषंगाने प्रकरणे दाखल झाली होती.

(३) सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी सन २०२२-२३ च्या निवडसूचीकरीता एकूण ६७८ पदांसाठी दिनांक २१/०३/२०२३ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली. दरम्यान पोलीस निरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठी योग्य मानीव दिनांक मिळण्यास आदेश होण्याबाबत श्री.शंकर मुटेकर व इतर (एकूण ४३) व श्री.संतोष पाटील व इतर एकूण (४१) दोन्ही मिळून एकूण ८४ यांनी दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.५५७/२०२१ व ६७६/२०२१ च्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठाने दिनांक ०९/०६/२०२२ च्या आदेशान्वये सपोनि ते पोनि पदाच्या पदोन्नतीवर स्थगिती दिली, त्यामुळे सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

उक्त न्यायालयीन प्रकरणांत मा.न्यायाधिकरणाने दिनांक २३/०९/२०२२ व दिनांक २८/०९/२०२२ रोजी आदेश पारित करुन याचिकाकर्त्यांना मानीव दिनांक देण्याबाबतचे आदेश दिले आहे. सदर आदेशाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात शासनाने रिट पिटीशन क्र.१५४८/२०२३ दाखल केली आहे.

शासनाने दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.१५४८/२०२३ च्या अनुषंगाने ८४ पदे रिक्त ठेवून सन २०२२-२३ च्या निवडसूचीवरील उर्वरित पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने मा.उच्च न्यायालयात आय.ए.क्र.१६७७९/२३ दाखल केला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सहायक पोलीस निरीक्षक पदावरुन पोलीस निरीक्षक पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने निवडसूची वर्ष २०२२-२३ च्यावेळेस न्यायालयीन प्रकरणे दाखल झाली. त्यामध्ये सत्र क्र. १०२ मधील सहायक पोलीस निरीक्षक श्री.संतोष खानविलकर व इतर १९९ यां नी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. १२२६/२०२२ व संकीर्ण अर्ज क्र. ७११/२०२२ दाखल के ला. त्यामध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १९/१२/२०२२ व दिनांक ०८/११/२०२३ रोजी आदेश पारित करुन पोलीस उप निरीक्षक पदाच्या मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेमध्ये आरक्षण घेवून उत्तीर्ण झालेल्या व पोलीस उप निरीक्षक पदाची सेवाज्येष्ठता प्राप्त झालेल्या सत्र १०२ व त्यावरील सहायक पोलीस उपनिरीक्षकांना वगळून इतर पात्र सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देण्याबाबत निदेश दिले आहेत. त्यानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाचे आदेश दिनांक १५/०३/२०२४ अन्वये १६८ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली.

तसेच, सत्र क्र.१०३ मधील अर्जदार श्री.बी.डी. कांबळे व इतर सहायक पोलीस निरीक्षक यांनी पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळणेबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. १२६८/२०२२ व संकीर्ण अर्ज क्र. १७/२०२४ दाखल केला. त्यामध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १६/०१/२०२४ व दिनांक १८/०४/२०२४ च्या रोजी आदेश पारित करुन सरळसेवेने पोलीस उपनिरीक्षक पदावर भरती झालेल्या सत्र १०३ मधील अधिकाऱ्यांना पदोन्नतीने कार्यमुक्त करण्याचे निदेश दिले.

त्यानुसार पोलीस निरीक्षक पदावरील पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या सत्र क्र.१०३ मधील ४३३ सहायक पोलीस निरीक्षकांना, पोलीस निरीक्षक पदावर पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १०/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील पोलिसांची आठ तास ड्युटी करण्याबाबत

**(१९) २३५१३ (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८९०६ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी पार पाडत असलेल्या पोलिसांवर कामाचा अधिक ताण असून त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचे तासच निश्चित नसल्याने पोलीस दलात पोलीसांच्या विविध आजारांसह हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांवर होणारा कामाचा अधिक ताण विचारात घेऊन दिनांक १ जानेवारी, २०१७ पासून शासनाने पोलिसांना आठ तास कामाचे (ड्यूटी) नियमन करण्याचा निर्णय घेतला परंतु अद्यापही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पोलीसांची आरोग्य योजना, रिक्त पदांवरील पोलीस भरती तसेच आठ तास कामाचे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही. कामकाजाच्या अतिताणामुळे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) बृहन्मुंबई पोलीस दलात पोलीस अंमलदार यांची एकूण ५,३५८ एवढी रिक्त पदे असल्याने सण-उत्सव व इतर महत्वाचे बंदोबस्त, मोर्चा-आंदोलन, अधिवेशन, निवडणूक, अति महत्वाचे व महत्वाच्या व्यक्तींचे दौरे, सभा व दैनंदिन कामकाजाकरीता मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने ८ तास कर्तव्य योजना नियमितपणे राबविण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

मुंबई पोलीसांची आरोग्य योजनेंतर्गत १. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना, २. पोलीस अधिकारी/अंमलदार हे तणावमुक्त व निरोगी राहण्यासाठी आरोग्यविषयक तपासणी/शिबीर/ कार्यशाळा/ योगा / आरोग्यविषयक जागरूकता शिबिरांचे आयोजन करण्यात येते, ३. कामाच्या ठिकाणी व्यायमशाळेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच, सन २०२४-२५ ची पोलीस भरती प्रक्रियेत एकूण २,४५९ पोलीस शिपाई यांची भरती सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२०) २३५१४ (२२-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चतीमध्ये अनियमितता असल्याने सुधारित वेतन निश्चिती करण्याबाबत भंडारा जिल्ह्यातील सेवानिवृत्त पोलिसांनी पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस दलातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन निश्चिती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भंडारा जिल्ह्यातील ३२२ सेवानिवृत्त पोलीस अंमलदार यांच्याकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, त्यांची सुधारित वेतननिश्चिती करुन, अनुज्ञेय आर्थिक लाभ संबंधितांना देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.